# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.11.2025** **वारःरविवार**

---

१.सर्वांना न्याय उपलब्ध असेल तरच सामाजिक न्याय सुनिश्चित करता येईल-पंतप्रधानांचं प्रतिपादन, कायदेशीर मदत वितरण यंत्रणा सक्षमीकरण परिषदेचं नवी दिल्लीत उद्‌घाटन

२.गडचिरोली जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेत अमूलाग्र परिवर्तन घडून येईल - मुख्यमंत्र्यांचा विश्वास

३.ग्लोबल पुलोत्सवाचा पुण्यात समारोप, पंडित अजय चक्रवर्ती यांना पुल स्मृती सन्मान आणि

४.ऑस्ट्रेलियाविरुद्‌ध वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारताचा 2-1 असा विजय

**पंतप्रधानन्यायालय**

सामाजिक अथवा आर्थिक पार्श्वभूमीचा विचार न होता प्रत्येकाला न्याय मिळेल, तेव्हाच सामाजिक न्यायाची हमी देता येईल असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. न्यायदान प्रक्रिया बळकट करण्यासाठी राष्ट्रीय चर्चासत्राचं काल नवी दिल्लीत उद्‌घाटन करताना ते बोलत होते. गेल्या काही वर्षांत सरकारनं न्याय सुलभतेच्या दृष्टीनं अनेक उपाययोजना केल्या असून कायदेविषयक जनजागृतीला प्रोत्साहन देण्याला सरकारचं प्राधान्य असल्याचं त्यांनी सांगितलं.

यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणानं तयार केलेल्या समाज मध्यस्थी प्रशिक्षण अभ्यासक्रमाचं उद्‌घाटन करण्यात आलं.

या कार्यक्रमाला कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल उपस्थित होते. गरजू लोकांना कायदेविषयक मदत देण्यात राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणानं महत्त्वाची भूमिका बजावली आहे असं मेघवाल यांनी सांगितलं. प्रत्येकाला

कायदेशीर मदत मिळावी या उद्देशानं टेलि लॉ सेवा सुरू करण्यात आली. २०१७ पासून आतापर्यंत एक कोटींपेक्षा जास्त नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला अशी माहिती त्यांनी दिली.

**<u>पंतप्रधानवंदेभारत</u>**

वंदे भारत, नमो भारत, अमृत भारत यासारख्या रेल्वेगाड्या भारतीय रेल्वेच्या भविष्याचा पाया रचत आहेत असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. वाराणसी इथून काल चार नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांचा प्रारंभ पंतप्रधानांच्या हस्ते निशाण दाखवून करण्यात आला, त्यानंतर ते बोलत होते. विकसित देशांच्या आर्थिक विकासात पायाभूत सुविधांच्या विकासानं महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं सांगून पंतप्रधान म्हणाले,

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>संसदअधिवेशन</u>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन १ ते १९ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. याबाबतच्या प्रस्तावाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजूरी दिली आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे ही माहिती दिली.

**<u>मुख्यमंत्री</u>**

आरोग्य व्यवस्था भक्कम झाल्यामुळं गडचिरोली जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेत अमूलाग्र परिवर्तन घडून येईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. अहेरी इथल्या महिला आणि बाल रुग्णालयाचं लोकार्पण काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत आता २ हजार ४०० आजारांचा समावेश करण्यात आला असून, त्याचा फायदा गोरगरीब नागरिकांना होईल असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले,

कोठी आणि रेगडी इथलं प्राथमिक आरोग्य केंद्र, वेंगणूर इथलं उपकेंद्र, जारावंडी आणि ताडगाव इथल्या प्राथमिक आरोग्य पथकांच्या इमारती तसंच चामोर्शी, मुलचेरा, धानोरा, एटापल्ली इथल्या आयुष्यमान आरोग्य मंदिराचं लोकार्पण यावेळी मुख्यमंत्र्यांनी ऑनलाईन पद्धतीनं केलं. सिरोंचा इथल्या बहु विशेषोपचार रुग्णालयाचं तसंच वैद्यकीय आणि नर्सिंग महाविद्यालयाचं भूमिपूजनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.

'आदिशा' प्रकल्पाच्या अंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना साडेतीन कोटी आणि प्रत्येक महिला बचत गटाला एक लाख रुपयांचं फिरतं भांडवलही फडणवीसांच्या हस्ते प्रदान करण्यात आलं.

**<u>गडकरी</u>**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये राजस्व अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते काल नागपूरमध्ये बोलत होते. राजस्व संकलनाच्या प्रमाणात लोककल्याणकारी योजनांसाठी निधी उपलब्ध होतो. त्यामुळं भारतीय राजस्व सेवेतील अधिकाऱ्यांचं लोककल्याणकारी अर्थव्यवस्थेतील योगदान महत्त्वाचं आहे असं मत गडकरी यांनी व्यक्त केलं.

अकादमीचे महासंचालक एस के मॅथ्यूज, आयकर लवाद प्राधिकरणाचे अध्यक्ष न्यायमूर्ती चंद्रकांत भडंग यावेळी उपस्थित होते.

**<u>निवडणूकआयोग</u>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांची संख्या वाढवून ४० करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगानं ही माहिती दिली आहे. गेल्या महिन्यात झालेल्या बैठकीत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी प्रमुख प्रचारकांच्या संख्येत वाढ करावी अशी मागणी आयोगाकडे केली होती.

**<u>सन्या</u>**

**<u>इंट्रो</u>**

देशभरात भटक्या श्वानांचा उपद्रव वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना अशा श्वानांची तत्काळ व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. ते लागू करण्यासाठी आठ आठवड्यांची मुदतही दिली आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत माझ्या सहकारी मंजुषा गायधनी यांच्याकडून...

**<u>स्क्रीप्ट</u>**

भटके श्वान लोकांना चावण्याच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ झाली असल्यामुळं अशा श्वानांच निर्बीजीकरण आणि लसीकरण केल्यानंतर त्यांना निवारागृहांमध्ये ठेवा, मूळ ठिकाणी आणून सोडू नका, असं न्यायालयानं सांगितलं आहे. नगरपालिकांनी दर तीन महिन्यांनी भटके श्वान कुठेही शहरांमध्ये मोकाट राहणार नाहीत याची खात्री करायची आहे. महामार्ग आणि द्रुतगती मार्गांवरुन भटक्या श्वानांसोबतच अन्य जनावरांना देखील दूर करुन त्यांचं निवारागृहांमध्ये पुनर्वसन करण्याचे निर्देश राजस्थान उच्च न्यायालयानं यापूर्वी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिले होते, त्यालाही सर्वोच्च न्यायालयानं मान्यता दिली. श्वानदंशांचे वाढते प्रकार म्हणजे प्रशासकीय उदासीनताच म्हणावी लागेल, नागरिक, विशेषतः लहान मुलं, रुग्ण, वयोवृद्ध यांचं जीवन आणि सुरक्षितता यांचे मूलभूत अधिकार जपण्यासाठी न्यायालयीन हस्तक्षेप आवश्यक असल्याचंही न्यायालयाच्या खंडपीठानं स्पष्ट केलं.

**<u>पुलं</u>**

शास्त्र आणि कला या दोन्ही गोष्टी आपल्याला शांततेच्या सुरात नेऊन ठेवतात. पुण्यात आयोजित पुल स्मृती सन्मान सोहळ्यात पंडित अजय चक्रवर्ती यांचे सूर आणि पु. ल. देशपांडे यांच्या शब्दांनी भाव आणि बुद्धी, रस आणि तर्क, गाणं आणि ज्ञान या साऱ्यांचा सुंदर संगम घडविला आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर रघुनाथ माशेलकर यांनी काढले.

ग्लोबल पुलोत्सवाच्या समारोप समारंभात पंडित अजय चक्रवर्ती यांचा डॉक्टर माशेलकर यांच्या हस्ते काल पुल स्मृती सन्मान देऊन गौरव करण्यात आला, त्या वेळी माशेलकर बोलत होते. या सन्मान सोहळ्यानं तीन दिवसीय ग्लोबल पुलोत्सवाचा समारोप झाला.

तत्पूर्वी, ‘आस्वादक पुलं’ या परिसंवादातून पुलंच्या रसिकत्वाचं दर्शन उपस्थित रसिकांना घडविण्यात आलं. पुलंना कलेमागील माणूसही महत्त्वाचा वाटायचा. आस्वादक वृत्तीला कृतीची जोड देत पुलंनी रसिकता जोपासली अशी भावना मान्यवर वक्त्यांनी या परिसंवादात व्यक्त केली.

**<u>उद्योगमंत्री</u>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुडाळ एमआयडीसीत वर्षानुवर्षे पडून असलेल्या भूखंडधारकांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्याचे आदेश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत. ते काल कुडाळ इथं एका सत्कार समारंभात बोलत होते. आडाळी एमआयडीसीतल्या ३४ हेक्टर जमिनीचा शोध लावून त्यातून उद्योजकांना भूखंड वितरित केले जातील असं सामंत म्हणाले.

**क्रिकेट**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध वीस षटकांच्या सामन्यांची क्रिकेट मालिका भारतानं 2-1 अशी जिंकली आहे. मालिकेतला निर्णायक पाचवा सामना काल पावसामुळं रद्द करावा लागला. त्यामुळं चौथा सामना जिंकून मालिकेत आघाडी घेतलेल्या भारतीय संघानं मालिका जिंकल्याचं घोषित करण्यात आलं. भारतीय फलंदाज अभिषेक शर्मा मालिकावीर ठरला. या विजयामुळं ऑस्ट्रेलियाविरुद्ध वीस षटकांच्या क्रिकेट सामन्यांची मालिका जिंकण्याची गेल्या १७ वर्षांपासूनची परंपरा भारतानं कायम राखली आहे.

कालच्या सामन्यात नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियानं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. पावसामुळं खेळ थांबवावा लागला तेव्हा भारतानं ५२ धावा केल्या होत्या.

**हवामान**

राज्यात काही भागात आता थंडी जाणवू लागली आहे. नाशिक, जळगांव शहरांत किमान तापमान १० ते १२ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आलं आहे. अन्य काही शहरांमध्येही किमान तापमान २० अंशांच्या खाली आलं आहे. आज सर्वत्र हवामान कोरडं असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**